# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## शैक्षणिक प्रवेश विभाग

### विद्यापीठ शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

### अनुसुचित जमाती (ST) स्कॉलरशीप व फ्रिशिप नवीन/नुतनीकरणाबाबत.

मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांच्या आदेशानुसार अनुसुचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना Online पध्दतीने सन २०१६–१७ साठीचे स्कॉलरशीप व फ्रिशिप अर्ज भरावयाचे आहेत.

शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी खालील वेबसाईटवरून प्रथम User ID तयार करून Login करून अर्ज भरावेत.

http://etribal.maharashtra.gov.in

वेवसाईटवरील अर्ज विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर Online पध्दतीने पुर्ण भरून त्याची प्रिंट काढून आवश्यक त्या कागदपत्रासह संबंधित विभागात अर्ज सादर करावेत. विभागाने प्रत्येक प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती शिष्यवृत्ती / फ्रिशिप याप्रमाणे वेगवेगळी करून Excel Format मध्ये भरून सीडी व हार्ड कॉपीसह पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे दि. ०४/११/२०१६ पर्यंत पाठवावी Online पध्दतीने प्रत्यक्ष अर्ज भरताना खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

तसेच विनाअनुदानित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिप चा ऑनलाईन अर्ज भरताना जातवैधता प्रमाणपत्र क्रमांक भरणे आवश्यक आहे. तसेच हार्ड कॉपी सोबत जात वैधता प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक राहिल.

जे अभ्यासक्रम शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे अशा विभागातील विद्यार्थ्यांनी त्वरीत Online अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

ऑनलाईन पध्दतीने प्रत्यक्ष अर्ज भरताना विद्यार्थ्यांसोबत खालील कागदपत्रे आवश्यक आहेत

०१. इयत्ता १० वी पासूनच्या सर्व गुणपत्रिका व प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत
०२. जातीचा दाखलाची झेरॉक्स प्रत
०३. जाती प्रमाणपत्र पडताळणी दाखला
०४. आधारकार्डची झेरॉक्स प्रत
०५. स्वत:चे वैयक्तिक राष्ट्रीयकृत बॅंकेतील विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक, बॅंकेचा एमआयसीआर आणि आयएफएससी कोड असलेले बॅंक पासबुकची झेरॉक्स प्रत
०६. बॅंक खाते क्रमांक आधारकार्डशी सलंग्न करणे
०७. सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला किंवा Form-16 ची झेरॉक्स प्रत
०८. विभागात प्रवेश घेतलेल्या प्रवेश पत्राची झेरॉक्स
०९. शाळा सोडल्याचा दाखला

१०. शैक्षणिक वर्षाच्या कालावधीमध्ये गॅप असेल तर त्यासंबधीचे प्रमाणपत्र सादर करावे.

११. सन २०१६–१७ या शैक्षणिक वर्षाच्या अगोदर पदव्युत्तर परीक्षा दिलेली असेल तर त्याबाबतचा उल्लेख करावा व त्यासंबधी प्रमाणपत्र जोडावी.

सन २०१६–१७ या शैक्षणिक वर्षाच्या अगोदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांत शिष्यवृत्तीचा अर्ज केलेला असेल तर असे विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी पात्र राहणार नाही. एखादया विद्यार्थ्यांनी चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करून शिष्यवृत्ती मिळवली असेल त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल व फी वसूल केली जाईल. बँक खात्याबाबत काही चुकीची माहिती दिल्यास होणाऱ्या आर्थिक नुकसानीस तो विद्यार्थी स्वत:च जबाबदार असेल यांची नोंद घ्यावी.

जे विद्यार्थी वेळेत Online पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना स्कॉलरशीप व फ्रिशीप शासनाकडून मिळणार नाही. त्यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. तसेच ज्या विद्यार्थ्यांची फी शासनाकडून परतावा होणार नाही किंवा संबंधित अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती योजना लागू नसल्यास अशा प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्या अभ्यासक्रमासाठी लागू असलेले संपूर्ण शुल्क भरणे बंधनकारक आहे. यांची नोंद घ्यावी.

6/10/2016.
सहा. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/ ४०५३
दिनांक :०६/१०/२०१६

प्रत :मा. विभागप्रमुख
आपल्या विभागातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात तसेच अर्जाची प्रती आवश्यक त्या कागदपत्रासह विहित मुदतीत या विभागाकडे सादर करण्यात यावे ही विनंती.